# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ४/२/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२०) इतिवृत्त

**बुधवार,** दिनांक **०४ फेब्रुवारी २००९ रोजी** स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी ४-३५ वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला मा.प्रभारी आयुक्त तथा उप आयुक्त(म.) श्री.उध्दव घुगे, नगर सचिव श्री. एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान मामु
२. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
३. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
४. श्री.वसंत नरवडे पाटील
५. सौ. अल्पा विकास जैन
६. श्री. संजय रामदास जोशी
७. श्रीमती जयश्री किवळेकर
८. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
९. श्री. रविकांत काशीनाथ गवळी
१०. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
११. श्री. कचरू श्रीपत सोनवणे
१२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
१३. श्री. सिताराम इसराम सुरे
१४. श्री. नारायण कुचे
१५. श्री. जावेद हसन खान

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | :गेल्या १५ दिवसांपासून सिडको, हडको परिसरात कमी दाबाने पाणी येत आहे. त्याचे कारण काय आहे. सिडको हडको परिसराला नेहमीच दुय्यम स्थान मिळत आहे. |
| श्री.सतिष कटकटे | :महानगरपालिकेत तिन उपआयुक्त आहेत परंतु बैठकीस एकही अधिकारी उपस्थित नाही. |
| मा.सभापती | :उपआयुक्त (प्र) हे संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरू आहे ते पहाणी करण्यासाठी गेलेले आहे तश्या सुचना त्यांनी दिलेल्या आहेत. :उपआयुक्त (म) हे उच्च न्यायालयात गेलेले आहेत ते बैठकीत येत आहे. |
| श्री.सतिष कटकटे | :साफसफाईची कुठली विशेष मोहिम सुरू आहे काय? |
| मा.सभापती | :संत गाडगे महाराज स्वच्छता अभियात सुरू आहे. |
| श्री.सतिष कटकटे | :वॉर्ड ड मध्ये प्रभाग समितीचा सभापती असतांना मागील वर्षी ५ लाखाचा संत गाडगे महाराज स्वच्छता पुरस्कार भेटला होता त्याची विल्हेवाट कुठे लावली. याचा खुलासा करण्यात यावा. |

मा.सभापती :उपआयुक्त (प्र) बैठकीस उपस्थित नाहीत.

श्री.संजय जोशी :वार्ड फ कार्यालयासही पुरस्कार मिळाला होता त्या पुरस्कार रकमेतुन घंटागाडी घ्यायची की रिक्शा घ्यायची असा विचार झाला होता. त्या रकमेचाही कुठे विल्हेवाट लावली कळाले नाही.

श्री.रविकांत गवळी :आता उन्हाळा लागत आहे. सिडको-हडकोला पाणी कमी येते, असेच राहणार का. पाण्याच्या बाबतीत खुलासा करण्यात आलेला नाही.

श्री.वसंत नरवडे :गेल्या महिनाभरापासून माझ्या वार्डात घरातील नळास दुषित पाणी येत आहे. सदरील दुषित पाण्याचा नमुना दाखविण्यासाठी आणलेला आहे. परवानगी असेल तर दाखवतो.

मा.सभापती :स.सदस्य यांनी दुषित पाण्याचे नमुणे आणलेले आहे ते सभागृहात आणावेत.

श्री.वसंत नरवडे : गेल्या दोन मिटींगपुर्वी कामाचे क्षेत्र विभागले गेले. पुर्वी पाण्याची जी व्यवस्था होती ती सेंट्रलाईज पध्दतीची होती. विचारता येत होते. परंतु प्रत्येक कार्यकारी अभियंता आणि उप अभियंता यांनी त्याप्रमाणे कामे सुरू केलेली नाहीत. कार्यकारी अभियंता हे हेड ऑफिसमध्येच बसलेले असतात वॉर्डामध्ये येत नाही.

(दुषित पाण्याचे तिन नमुने मा.सभापती यांना दाखविण्यासाठी सभागृहात आणले जाते.)

पहिले नमुण्यातील पाणी हे दलालवाडी येथून येते ते अर्धा तास गढूळ व ड्रेनेज मिश्रीत पाणी आहे. दुसऱ्या टप्प्यात अळया किडेयुक्त पाणी आहे. तिसरे दुर्गंधीयुक्त आहे. ठेकेदाराला पेमेंट नाही म्हणून एजन्सी मिळकत नाही असे बोलतात. नागरीकांना आणि नगरसेवकांना वेठीस धरण्याचे काम सुरू आहे तो योग्य नाही. घेतलेला जो निर्णय आहे त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. कामे करून घ्या. सर्व इंजिनिअर आहेत. सर्वांना माहिती आहे. सर्वांना शहर माहित आहे. कचरा तसेच १० लाखांची कामे झाली नाहीत.

मा.सभापती :तुमच्या वार्डात कार्यकारी अभियंता कोण आहे.

श्री.वसंत नरवडे :श्री.काकडे, श्री.रामटेके हे उप अभियंता आहेत. कार्यकारी अभियंता श्री.एम.डी.सोनवणे आहेत. पाण्याचा प्रश्न हा महत्वाचा प्रश्न आहे तो सोडविणे गरजेचे आहे, गेल्या एक महिण्यापासून कमी दाबाने पाणी येत आहे. स्वातंत्र्य कॉलनी, दलालवाडी, टिळकपथ येथे पाण्याची तिव्र चंटाई आहे. गढुळ पाण्याविषयी निर्णय देण्यात यावा. किती दिवसात हा प्रश्न सुटणार आहे.

श्री.सिताराम सुरे :सिडको हडको भागात सुध्दा पाण्याची बिकट स्थिती आहे. एका कुंटूबाला एक बॅरलसुध्दा पाणी मिळत नाही. वॉटर डिपार्टमेंट कुठल्याही एका अधिकाऱ्याकडे देण्यात यावे. जेणे करून पाणीपुरवठा विस्कळीत होणार नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर :पाण्याच्या बाबतीत व इतर कामांच्याबाबतीत सिडको हडकोला नेहमीच दुय्यम स्थान मिळालेले आहे. एक दिवसाआड पाणी दिले जाते व ते एक तास दिले जाते परंतु उन्हाळयाची चाहुल लागली आहे सिडको हडकोत अतिशय कमी दाबाने पाणी येत आहे. एक तास का असेना परंतु पुर्ण फोर्सने पाणी मिळाले पाहिजे. विजेची समस्या,टेक्निकल समस्या आम्ही समजू शकतो. एक तास पाणी सोडल्यास ४० मिनिटे पाणी नागरीकांना मिळते. सिडको हडकोमध्ये दिड तासतरी पाणी पुरवठा केला

पाहिजे तोही पुर्ण फोर्सने. पाण्याची जबाबदारी तिन्ही कार्यकारी अभियंता यांच्यावर निश्चित करण्यात यावी.

श्री.अ.रशिद मामु :पुर्वी शहरात संपूर्ण दिवस पाणी मिळत होते परंतु आत एक दिवसाआड पाणी येत आहे. कार्यकारी अभियंता यांना वॉर्ड डिस्टयुब्यूशन केले आहे तरी कामे होत नाही तर हे हेतुपुरस्करपणे केले जाते की काय? वार्ड ड मध्ये ऑफिसचे छत कोसळले आहे पाण्याच्या टाकीखाली हे ऑफिस आहे. त्या टाकीतून बऱ्याच ठिकाणी पाणी जाते. पाण्याच्या टाकीची पहाणी करून तसा अहवाल देण्यात आला आहे काय? आज सभागृहात गढूळ पाणी आणले. ज्यांना अंदाजपत्रक बनविता येत नाही त्यांना का भरती केले. जे.ई.ना इस्टीमेट बनवता नसेल येत तर त्यांची परीक्षा घेण्यात यावी. सर्व जे.ई. यांना रविवारच्या दिवशी बोलावून त्यांना ट्रेनिंग देण्यात यावी.

श्री.वसंत नरवडे : एक दिवसाआड पाणी देण्याचे कारण म्हणजे जनतेला आणि ऑफिसच्या नियोजनाला व्यवस्थितपणा आणण्यासाठी केले. पाण्याला प्रेशर येत नसेल तर नेमकी कारण शोधले पाहिजे.

मा.सभापती :प्रशासन रोज पाणी देत होते, आता एक दिवसाआड पाणी देण्याचा बदल केला.

श्री.वसंत नरवडे :पुर्वी सारखेच ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे. आपल्याकडे ई टेंडरींग करीता सॉफ्टवेअर खरेदी केले आहे मग त्यावरून इस्टीमेट का तयार करता येत नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :स.सदस्यांनी पाण्याविषयी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत. मा.आयुक्तांनी जी सिस्टीम राबविण्यात आली आहे ती हाणुन पाडण्याची योजना आहे. तपासून पाहावे. पाण्याच्या बाबतीत जे अधिकारी दुर्लक्ष करीत आहे त्यांच्या विरूध्द कार्यवाही करण्यात येवून चौकशी लावण्यात यावी. जे तिन अधिकाऱ्यांना वॉर्ड वाटून दिलेले आहे त्यांचे काम सुरू झाले आहे की नाही यांची माहिती देण्यात यावी ज्या कर्मचाऱ्यांची ट्रान्सफर झालेली आहे ते त्यांच्या अधिपत्याखाली काम करतात की नाही तसेच त्यांना काय अडचणी आहेत याचा खुलासा करण्यात यावा. अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या फिक्स करून त्यांच्याकडुन काम करून घेतले पाहिजे. सिडको हडको भागात पाण्याच्या वेळेमध्ये वाढ करण्यात यावी. पाण्याचे नियोजन येत्या उन्हाळयाच्या आत करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहे त्याबाबतीत श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(ई व फ): स.सदस्यांनी जे बाटल्यांमध्ये पाण्याचे नमुणे आणलेले आहे तो वार्ड माझ्याशी संबधीत नाही. तीन तारखेपासून वार्ड ई व फ हे वार्ड आहेत.

श्री.सतिष कटकटे :कागदोपत्री फक्त आदेश देण्यात आलेले आहे वास्तविक काम सुरू नाही.

श्री.वसंत नरवडे :पाण्याच्या बाबतीत मा.आयुक्त यांच्या सुचना प्रमाणे आदेश निघालेले आहे परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याने मी नमुणे घेवून आलो आहे. एकमेकांची जबाबदारी टाळली जात आहे. संबधीत खात्याविषयीची नोंदणी करून त्यांना आदेश देण्यात यावे म्हणजे कामे त्वरीत सुरू होईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :संबधीत अधिकाऱ्यांकडुन खुलासा घेण्यात यावा की काम सुरू केले आहे की नाही.

मा.सभापती :प्रशासनाने काढलेल्या आदेशाचे तिन्ही कार्यकारी अभियंता अंमलबजावणी करीत नाही.

श्री.रविकांत गवळी :सिडको हडको संदर्भात जे अपेक्षित उत्तर मिळालेले नाही. पाण्याचे नियोजन व्यवस्थितरीत्या नाही तसेच कमी दाबाने पाणी येत आहे. दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात सिडको हडको येथिल पाण्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. श्री.मिस्कीन नामक कर्मचारी आहे त्यांचेकडे मेन व्हॉल्व उघडण्याची आदेश आहेत. मेन व्हॉल्वचे सात थ्रेड उघडल्यास सिडको हडकोला पाणी पुरेश्या प्रमाणात येते. एक थ्रेड कमी उघडल्यास १ एमएलडी पाणी कमी येते. १ एमएलडी पाणी कमी आल्यामुळे वेळ व फोर्स कमी होतो. सिडको हडको येथील पाणी दुसरीकडे वळविण्यात आले का की जायकवाडीतुन पाणी कमी करण्यात आले. तिन्ही अधिकारी पाण्याच्या प्रश्नास जबाबदार आहे.

श्री.सिताराम सुरे :बदली हाणून पाडण्याचा प्रयत्न असेल तर कार्यवाही करावी. ज्या अधिकाऱ्यांची इच्छा नसेल तर राजीनामा द्यावा, घरी जावे. पाण्याच्या विषयी खेळी करू नये. जी सिस्टीम दिलेली आहे ती राबविली पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :प्रशासनाने खुलासा करावा की मा.आयुक्तांनी सिस्टीम तयार केली आहे त्या पध्दतीने काम सुरू आहे का? सिस्टीम सुरू नाही तर त्याचे कारण काय आहे.

श्री.वसंत नरवडे :जायकवाडी पैठण येथुन शहरातील पाण्याच्या टाक्या भरून घेण्याची जबाबदारी श्री.फालक यांच्याकडे आहे वाटप पध्दतीत कार्यकारी अभियंत्यांनी एक सुपरवाईझर ठेवून लक्ष ठेवणे ऐवढे सोपे काम आहे परंतु कामात दिरंगाई करण्याचा प्रयत्न होत आहे. तिन्ही कार्यकारी अभियंत्यानी पाण्याचा, ड्रेनेज, विद्युत हयाकडे लक्ष देवून काम केले पाहिजे. पाण्याच्या नियंत्रणासाठी शहर अभियंता किंवा उपआयुक्त (म) यांना तिन्ही कार्यकारी अभियंता यांच्यावर नियंत्रणासाठी नेमण्यात यावे. कार्यकारी अभियंता यांना वार्डमध्ये पाठविण्यात यावे.

मा.सभापती :शहर अभियंता यांनी खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अतिशय महत्वाचा प्रश्न आहे, सदरील प्रश्नावर अधिकाऱ्यांकडुन दुर्लक्ष झाले असल्यास त्याची सुधारणा केली जाईल. श्री.फालक यांना विचारणा केली असल्यास सिस्टीममध्ये काही चुक नाही. जेवढे पुर्वी शहराला पाणी येत होते तेवढेच आतापण येत आहे. वाटपासाठीही कर्मचारी तेच आहे फक्त supervision चा प्रश्न आहे. जे अधिकारी काम करीत नसेल तर त्यांच्यावर ॲक्शन प्रस्तावित करण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी :सिडको हडको भागातील पाणी इतरत्र वळविण्यात आले काय? श्री.मिस्किन यांनी सात थ्रेडचे सहा थ्रेड केलेत तर त्यांना तसे आदेशीत केलेले आहे काय?

श्री.वसंत नरवडे :मा.शहर अभियंता यांनी जो खुलासा केलेला आहे तो असमाधाकारक आहे. पाण्याच्या बाबतीत एकमेकांना सहकार्यासाठी प्रशासनाने सक्तीने संबधीत अधिकाऱ्यांना आदेशीत करावे. जे काही काम करायचे आहे ते ताबडतोब करावे लागणार आहे आचारसंहिता लागू झाल्यास कुठलेच कामे होणार नाही. भविष्यात ड्रेनेज,लाईट,पाण्याची स्थिती वाईट होईल त्यामुळे नागरीकांना आपण उत्तरे देवू शकणार नाही त्यामुळे मा.सभापती तसेच मा.आयुक्त म्हणुन आपल्याला कठोर भुमिका घ्यावी लागेल तेव्हाच हा प्रश्न सुटू शकेल. हेड ऑफिसमधील तिन्ही कार्यकारी अभियंता यांची कार्यालय बंद करून वॉर्डमध्ये स्थलांतरीत करण्यात यावे.

श्री.अ.रशिद मामु :महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना मनपाची संपुर्ण माहिती असणे आवश्यक आहे. पिपंरी चिंचवड येथे जेव्हा भेट देण्यात गेलो असता तेथील डॉक्टरांनी संपुर्ण मनपाची माहिती दिली. परंतु आपल्या इथे सदरील काम माझे नाही माझ्या हद्दीत नाही अशी उत्तरे दिली जातात. जो पर्यंत अधिकारी हा विचार करत नाही की आपण शहरासाठी काम करतो आहे तो पर्यंत हा प्रश्न सुटणार नाही.

मा.सभापती :अधिकारी कामा संदर्भात टाळाटाळ केल्यामुळे नागरीकांना व नगरसेवकांना त्याचा त्रास होत आहे. प्रशासनाने काढलेले आदेशाचे पालन होत नाही.

श्री.मोहन मेघावाले :हडको सिडको भागात १०१ टक्के वसुली आहे. माझ्या वॉर्डात टि.व्ही सेंटर ते सलिम अली सरोवर येथे दोन वर्षापुर्वी १३ लाखाची पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे.क्रॉस कनेक्शन करण्यासाठी काम थांबलेले आहे. दुसरे वर्ष आहे अजुनही क्रॉस कनेक्शन झालेले नाही. पाईप सदर ठिकाणी उपलब्ध आहे. साधूवाणी म्हणून गुत्तेदार आहे ते काम करण्यास तयार नाही.

श्री.सतिष कटकटे :प्रभाग-ड मधे मा.आयुक्तांनी काढलेल्या आदेशानुसार अधिकारी,कर्मचारी नियुक्त झालेले आहे काय?

मा.सभापती :श्री.पानझडे आपल्या आदेशाप्रमाणे अधिकारी कर्मचारी रूजू झालेले आहेत काय?

कार्यकारी अभियंता(ब व क) : माझ्याकडील सर्व कर्मचारी रूजू झालेले आहेत. त्यातील पाच कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या व त्यांच्या जागी पाच कर्मचारी देण्यात आलेले आहे. माझ्याकडे ब आणि क वार्ड आहे त्यानुसार काम सुरू झालेले आहे.

श्री.अ.रशिद मामु :सदरील आदेशात सिनॅरिटी सोडुन प्रभारी म्हणुन आदेश काढलेले आहे ते कसे. प्रमोशन देण्याचे अधिकार कुणी दिले आहे. प्रमोशन देण्याचे अधिकार आस्थापना विभागाचे आहे.

श्री.रविकांत गवळी :प्रत्येक अधिकाऱ्यांना दोन दोन प्रभाग दिले आहे परंतु श्री.एम.डी.सोनवणे यांनी कुठल्याही अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना ऑर्डर फॉलो केलेली नाही. त्याचे कारण काय आहे. मा.आयुक्तांचे आदेशाचे पालन ज्यांनी केले नाही त्यांच्याबाबतीत काय कारवाई करणार आहात.

श्री.अ.रशिद मामु :संबधीत कर्मचाऱ्यांचे आदेश आस्थापना विभागातुन निघालेले आहे.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

सहा.आयुक्त-१ :दोन्ही कार्यकारी अभियंता आणि अतिरिक्त शहर अभियंता यांचे्कडे जे कर्मचारी दिलेले आहेत तसेच श्री.शाकेर यांना प्रभारी उपअभियंता या पदाचे आदेश आस्थापना विभागाकडुन निघालेले आहेत.

श्री.अ.रशिद मामु :आस्थापना विभागाने प्रभारी म्हणून आदेश दिले. जे ज्येष्ठ आहेत त्यांनाच दिले.

मा.सभापती :मा.आयुक्तांची बदली झाल्यानंतर काय झाले या बाबतीत प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त (म) :मा.आयुक्तांची बदली झाल्यानंतर कुठलेही अधिकारी कर्मचाऱ्यांचे आदेश किंवा बदली करण्यात आलेली नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सदरील आदेश हे फक्त कागदोपत्री आहे.

श्री.अ.रशिद मामु :प्रभारी म्हणुन श्री.गायकवाड व श्री.फालक, श्री.शिरसाठ यांचे नावे आहे. जेष्ठता यादीला यामुळे धक्का लागेल काय?

श्री.रविकांत गवळी :सक्षम अधिकारी कर्मचारी असतांना सुध्दा काम होत नाही.मनपामध्ये ६४ जे.ई असतांनासुध्दा जे.ई नाहीत इमारत निरीक्षक नाही म्हणुन वारंवार तक्रार होत होती. इस्टीमेट,पेमेंट,बिले तयार होत नव्हते. आता जे आदेश काढलेले आहे एक कार्यकारी अभियंताना दोन दोन वार्ड आणि ३२ कर्मचारी त्यांच्या अधिपत्याखाली दिलेले आहे ते योग्य व चांगले आहे. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. दोन कार्यकारी अभियंता यांनी आदेशाचे पालन केले आहे श्री.एम.डी.सोनवणे, अतिरीक्त शहर अभियंता यांनी त्यांच्या अधिपत्याखाली जे कर्मचारी येतात त्यांना अजुन नियुक्तीपत्र दिलेले नाही. सदरील सिस्टीम हि चांगली आहे, सुरवातीचे दोन ते तिन महिणे त्रास होईल. जे अधिकारी रूजु झालेले नाही त्यांच्यावर काय कारवाई होणार आहे.

मा.सभापती :आदेश केव्हा निघाले आहे.

श्री.सतिष कटकटे :२७.०१.२००९ पुर्वी आदेश निघालेले आहे. जे नविन अधिकारी कर्मचारी वार्डामध्ये देण्यात आलेले आहे त्याची माहिती प्रत्येक नगरसेवकांना दिली पाहिजे म्हणजे संपर्क साधण्यास सोपे जाईल. कागदोपत्री आदेश देण्यात आलेले आहे सदरील कर्मचारी कुठे आहे हयाचा खुलासा व्हावा.

मा.सभापती :तिन्ही कार्यकारी अभियंता यांना ३२ कर्मचारी प्रत्येकी देण्यात आलेले आहे.

श्री.सतिष कटकटे :सहा महिण्यापुर्वी मा.महापौर व आपण वार्डामध्ये भेट दिली होती तेव्हा ते तेथील बांधकाम पडण्याच्या स्थितीत होते, तेव्हापासून कोणी अधिकाऱ्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. वार्डामधील इमारतीचे छत एका नागरीकांच्या अंगावर पडले त्यास जबाबदार कोण,

उपआयुक्त (म) :तिन्ही कार्यकारी अभियंता यांना १ जानेवारी पासुन नविन आदेश दिलेले आहे प्रत्येक कार्यकारी अभियंता यांच्या अंतर्गत ०२ वॉर्ड देण्यात आलेले आहे. दोन कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केलेला आहे. श्री.एम.डी.सोनवणे यांनी नविण आदेशा प्रमाणे कारवाई केली का याबाबत खुलासा घेवू. नसेल तर प्रशासन १०० टक्के त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :औरंगाबाद शहर सिडको हडको परिसरामध्ये पाणी पुरवठा करणे गरजेचे आहे परंतु स.सदस्यांच्या तक्रारीवरून पाणी पुरवठयाचे काम व्यवस्थित होत नाही हे स्पष्ट होते. उन्हाळा सुरू होत आहे म्हणून प्रशासनाने कार्यकारी अभियंता यांना जे आदेश काढलेले आहे त्याप्रामणे त्वरीत कार्यवाई करावी. जर पुढील बैठकीपुर्वी योग्यरीत्या कार्यवाई झाली नाही तर सभापती या नात्याने असे आदेश देत आहे की त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. अधिकाऱ्यांना पाण्यासाठी काय नियोजन करता येईल ते करण्यात यावे.

श्री.अ.रशिद मामु :रोशनगेट येथे महानगरपालिकेच्या जागेवर बेकायदेशिररित्या बांधकाम चालु आहे. सदरील पत्रात सिटी सर्व्हे नंबर नमुद करण्यात आला आहे. कार्यवाही होत नाही. तपासणी करावी.

मा.सभापती :स.सदस्यांनी रोशनगेट येथील प्रश्न विचारलेला आहे त्यासंबधीत फोटो देण्यात आला आहे. हे अनधिकृत बांधकाम त्वरीत थांबविण्यात यावे व केलेल्या कारवाई विषयी मा.शहर अभियंता यांनी स्थायी समितीस तिन दिवसात कळविण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे :जाफरगेट येथील रविवारच्या बाजारातही बेकायदेशिररित्या बांधकाम सुरू आहे तेही थांबविण्यात यावे.

मा.सभाती :जाफरगेट येथील रविवारच्या बाजारातील बेकायदेशिररित्या जे बांधकाम चालू आहे त्या विरूध्दही कारवाई व्हावी.

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डातील विद्युत खांबावरील ४० लाईट्स बंद आहेत. संबधीत गुत्तेदारास सांगीतले असता तो काम करण्यात तयार नाही. नविन गुत्तेदार कोण आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :विषय पत्रीकेत सदरच्या बाबतीत विषय आलेला आहे.

श्री.सतिष कटकटे :प्रशासनाने कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या आदेशाबाबत माहिती नगरसेवकांना देण्यात आलेली नाही.

मा.सभापती :उपआयुक्त(म) यांना आदेशीत करण्यात येते की, तिन्ही कार्यकारी अभियंता यांचेकडे जे काम वाटप करण्यात आले आहे त्याबाबत कुणाकुणाकडे कुठली जबाबदारी आहे अशी सर्व लेखी माहिती १०४ नगरसेवकांना २४ तासात देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :माझ्या वॉर्डातील ३६ मिटर रूंदीचा रस्ता गेल्या विस वर्षापासून डिपी प्लॅन मध्ये आहे दोन वेळेस टेंडर काढण्यात आलेले आहे आतापर्यंत त्या रस्त्याबाबत काहीच झालेले नाही. मा.शहर अभियंता यांनी पहाणी केलेली आहे. शासनाकडुन जो निधी आलेला आहे तो तिथे वापरण्यात यावा.

मा.सभापी :सदरील काम तात्काळ करण्यात यावे.

श्री.नारायण कुचे :गेल्या बैठकीमध्ये सि.सर्व्हे नं. २३५० सौ.पाशा बेगम यांना बांधकाम परवानगी दिली होती त्या बाबत माहिती विचारण्यात आली होती. ती माहिती अद्याप मिळालेली नाही.

मा.सभापती :माहिती प्राप्त झाली आहे मा.शहर अभियंता खुलासा सादर करतील.

मा.शहर अभियंता :श्री.खन्ना यांचेकडे संचिका आहे ते खुलासा करतील.

उप अभि.(न.र.) :मोहल्ला बुढ्ढीलेन येथील सिटीसर्व्हे नं. २३५० येथे श्रीमती पाशा बेगम यांना बांधकाम परवानगी देण्यात आली होती. परंतु ती जागा महानगरपालिकेची असल्याचे अपील सिटी सर्व्हे ऑफिसमध्ये असल्यामुळे ती रद्द करण्यात आलेली आहे, सध्या जागा ओपन आहे, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मा.सभापती :बांधकाम परवानगी देण्यात आली होती ती रद्द करण्यात आली आहे सध्या कुठलेही काम त्या जागेवर सुरू नाही.

श्री.नारायण कुचे :सुरवातीस परवानगी दिली त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे :परवानगी देतांना अधिकाऱ्यांनी चौकशी करावयास पाहिजे होते.

श्री.नारायण कुचे :बांधकाम परवानगी देण्यात आली आणि नंतर परवानगी रद्द करण्यात आली आहे तर परवानगी देण्यापूर्वीच चौकशी करावयास पाहिजे होती. यास कोण जबाबदार आहे.

मा.सभापती :बांधकाम परवानगीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे काय?

उप अभि.(न.र.) :मान्यता देण्यात आली. बांधकाम परवानगी दिली नंतर परवानगी रद्द करण्यात आली.

श्री.नारायण कुचे :सदरील जागा मनपाच्या मालकीची असतांना परवानगी देण्यात आली व नंतर रद्द करण्यात आली. सुरवातीलाच चौकशी करून परवानगी द्यायला पाहिजे होते.

मा.सभापती :पी.आर.कार्ड कुणाच्या नावावर आहे.

| | |
|---|---|
| उप अभि.(न.र.) | :पी.आर कार्ड अर्जदार (श्रीमती पाशा बेगम ) नावावर आहे. सिटी सर्व्हे ऑफिसमध्ये अपिल आहे व पी.आर.कार्डावर आक्षेप असल्यामुळे परवानगी रद्द करण्यात आली आहे. |
| श्री.नारायण कुचे | :सर्व कागदपत्र खोटे असून मनपाच्या अधिकारी यांनी संगनमत करून परवानगी दिली. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :मा.शहर अभियंता यांना चौकशी करण्यास सांगुन प्रकरणाची संपूर्ण माहिती घेवून संबधीत अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. |
| मा.सभापती | :सिटी एस नं. २३५०च्या बाबत बांधकाम परवानगी दिली याबाबतची संपूर्ण चौकशी मा.शहर अभियंता यांनी करून पुढील स्थायी समितीच्या बैठकीत अहवाल देण्यात यावा. |
| श्री.नारायण कुचे | :मुकूंदवाडी येथील अतिक्रमणाबाबत न्यायालयाचा स्टे आहे. विधी सल्लागार यांनी खुलासा दयावा की ५ ते १० वर्ष कोर्टाचा स्टे राहत असतो का. निकाल का येत नाही महानगरपालिकेचे वकीलांचे पॅनल काय करते. |
| मा.सभापती | :याबाबत प्रशासनास निर्देश देण्यात येते की, मा.उच्च न्यायालयात योग्य तो वकील लावण्यात येवून कायदेशीर कारवाई करण्यात यावी. |
| श्री.सिताराम सुरे | :३६ मीटर रूंदिचा रस्ता कशातुन करणार याबाबत रूलिंग देण्यात यावी. |
| मा.सभापती | :उद्या बोलावू व याबाबत चर्चा करू. |
| श्रीमती सफिया मोमीन | :मनपा येथे १० उर्दु शिक्षकांची सलेक्शन करण्यात आले आहे. परंतु नेमणुक केली जात नाही. |
| मा.सभापती | :१० उर्दु शिक्षकांची नेमणुकीचे आदेश देण्याची कार्यवाही करावी. |
| श्रीमती सफिया मोमीन | :श्री.अशोक नारायण यांचे इंक्रिमेंट चालू करण्यात यावे. |
| मा.सभापती | :ठिक आहे, श्री.अशोक नारायण यांचे इंक्रिमेंट चालू करावे. |
| श्रीमती सफिया मोमीन | :अब्रार कॉलणी गुंठेवारी भागात आहे किंवा नाही. अब्रार कॉलणी ग्रामपंचायतीमध्ये येत असतानां मनपा गुंठेवारी अंतर्गत टॅक्स कशे वसुल केल्या जातो. औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात बातमी आली आहे त्याबाबत खुलासा करण्यात यावा. |
| गुंठेवारी कक्ष प्रमुख | :वॉर्ड नं.९६ अब्रार कॉलनी या भागात सध्या गुंठेवारीचा कॅम्प चालू आहे दोन दिवसात १ लाख ९६ हजार ८०० रूपये जमा केले आहे तेथील नागरीक श्री.जावेद शब्बीर पटेल यांनी एक आक्षेप आणुन दिला आहे की अब्रार कॉलनी सातारा ग्रामपंचायतीमध्येही मोडत आहे तसा निर्णय अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दिनांक ३०.०७.२००७ रोजी दिलेला आहे. त्यानुषांगाने त्यांनी एक प्रेस नोट उर्दु वर्तमानपत्रात दिली त्याला प्रसिध्दी देण्यात आली आहे व त्यात तेथील जनतेला विनंती केली आहे की गुंठेवारीचे पैसे भरू नये. त्यामुळे जनतेत गोंधळ निर्माण झालेला आहे. त्या भागात मनपान सोई सुविधा पुरविलेल्या आहे, बजाज रूग्णालयाला मनपाने बांधकाम परवानगी दिलेली आहे आणि डिपी प्लॅनमध्ये हा भाग मनपामध्ये मोडत आहे. पीटीशन क्रमांक १९४८/२००५ दाखल झालेले आहे व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :सर्व सुविधा महानगरपालिका त्या भागाला देत आहे मग एखादया व्यक्तीने आक्षेप दाखल केल्यामुळे किंवा अप्पर जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्णय याच्याशी काय संबध येतो तसेच अप्पर जिल्हाधिकारी यांना कोणी अधिकार दिला आहे. |

गुंठेवारी कक्ष प्रमुख :गुंठेवारीचा कॅम्प चालू आहे व गुंठेवारी वसुलीचे काम अजूनही सुरू आहे. जे रिट पिटीशन आलेले आहे ती विधी सल्लागार यांचेकडे पाठवित आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शहराचा विकास हयामुळेच खुंटलेला आहे. गुंठेवारीच्या संदर्भात सर्वांची जबाबदारी आहे की लवकारात लवकर कामे व्हावी.

श्री.मोहन मेघावाले :पाण्याच्या संदर्भात सर्व सदस्यांनी गंभीरपणे चर्चा केली आहे व आदेश दिले आहे मात्र माझ्या वार्डातील क्रॉस कनेक्शन लाईनचा खुलासा केला नाही त्याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.रशिद मामु :आझाद कॉलेज समोरील गुंठेवारी भागातील जनता पैसे भरण्यास तयार आहे परंतु पैसे भरून घेत नाही. मा.माजी आयुक्त श्री.वैद्य साहेबांनी ले आउट मंजूर केलेले आहे.

मा.सभापती :ले आऊट मंजूर आहे काय?

गुंठेवारी कक्ष प्रमुख : सर्व्हे नं ११५,११७ किनू हॉउसिंग सोसायटी, हिमायतनगर पूर्ण संचिका गुंठेवारीत दाखल आहे. दोन वर्षापुर्वी ५० टक्के प्रशमन शुल्क नागरीकांकडुन भरून घेण्यात आलेली आहे. सदरील जागेचा वाद आहे दोन तिन बैठका त्यासंदर्भात झालेल्या आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :विद्या निकेतन कॉलनीत १९७२ पासुन वाद घालण्याचा प्रयत्न चालु आहे.

मा.सभापती :महानगरपालिका बांधकाम परवानगी देवू शकते परंतु टायटल देण्याचा अधिकार महानगरपालिकेला नाही.

गुंठेवारी कक्ष प्रमुख़ :सर्व्हे नं ११५ मध्ये एकही प्रकरण आता पर्यंत मंजुर केले नाही. सर्व्हे नं. ११६ मध्ये गुंठेवारी नियमित केलेली आहे.

मा.सभापती :मा.श्री.गुप्ता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून आपणास आदेश दिले होते. मा.आयुक्तांचे आदेश बंधनकारक नाही काय? महानगरपालिकेला ज्या ठिकाणाहून उत्पन्न मिळते तिथे कोणते अधिकारी खोडा घालण्याचे काम केले जाते. ईनु हाउसिंग सोसायटी बेकायदेशीर होती म्हणुन ५५ टक्के रक्कम का त्यांच्या कडुन भरून घेतली.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :गुंठेवारी अधिनियम २००१ असे म्हणतो संचिका सादर करतानाच १०० टक्के प्रशमन शुल्क भरावयाचे काही अटी व शर्ती टाकून लिहिलेले आहे. संचिका तपासणी झाल्यानंतर जर ती संचिका रद्द होते तर त्यांचे पैसे परत करण्यात येते.

मा.सभापती :तसे पत्र पाठविण्यात आले आहे काय?

गुंठेवारी कक्ष प्रमुख :रद्द करण्यात आलेले नाही, नियमीत करण्याचे काम सुरू आहे. ५० टक्के रक्कम तेथील नागरीकांनी भरलेली आहे फक्त त्याची छाननी करून ५० टक्के रक्कम भरून फाईनल आदेश द्यायचे आहे.

मा.सभापती :स.सदस्यांनी ईनु हाऊसिंग सोसायटीचा जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत मा.शहर अभियंता हे संचिका पाहून योग्य तो निर्णय देतील.

श्री.नारायण कुचे :मा.शहर अभियंता यांनी एक पत्र पाठविले की, आमदार खाजदार निधीतुन जसे काम होते तसे नगरसेवक निधीतून काम होईल सहा मिटरच्या रस्त्यासाठी नगरसेवक निधी वापरता येईल. गुंठेवारी भागात १० ते १५ फुटाचे रस्ते आहे. निधी वापरतांना कुठलेही असे निकष वापरू नये. असे आदेशीत करावे.

श्री.अ.रशिद मामु :स.सदस्यांचे जो प्रश्न उपस्थित केला तो योग्य आहे.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

शहर अभियंता :गुंठेवारीत स्वेच्छा निधीत वापरत नव्हतो, आमदार खाजदारांचाही निधी वापरत नव्हतो परंतु त्यास परवानगी देण्यात आली आहे व नगरसेवक

निधी वापरण्यासही परवानगी दिली आहे. जे निकष आहे ते शासनाकडुन येणे अपेक्षीत आहे. काम सुरू व्हावे म्हणून केलेले आहे.

श्री.सतिष कटकटे :नंदनवण कॉलणी येथील जनतेने गुंठेवारीचे १५ लाख रूपये भरणा केलेली आहे परंतु प्रशासनामार्फत ड्रेनेज कामासंबंधी कुठलीही कार्यवाही झालेली नाही.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :चालान वाटप करणे आणि पैसे भरून घेणे हे गुंठेवारी विभागाचे काम आहे इस्टीमेट तयार करणे आणि पैसे खर्च करणे हे संबधीत वार्डाचे काम आहे.

मा.सभापती :नंदनवण कॉलणी येथील संबधीत नागरीकांनी १५ लाख रूपये गुंठेवारीचे भरणा केलेली आहे त्या ठिकाणचे इस्टीमेट तयार करून तात्काळ काम सुरू करण्यात यावे.

श्री.संजय जोशी :मागील बैठकीत मोबाईल टॉवरबाबत विषय काढला होता. बऱ्याच कंपण्यांनी पैसे भरणा केल्याचे दाखविण्यात आले आहे. आजच्या बैठकीत सदर पैसे भरणा केल्याचे चालान दाखविण्यासाठी आणण्यात आले आहे. रिलायन्स इन्फोटेक लि. पुणे अनामत रक्कम न परतावा ५० हजार कुठल्या भागासाठी, कुठल्या टॉवरसाठी, याचा हयामध्ये काहीच उल्लेख नाही. मुळ प्रतिवर एवढाच उल्लेख केलेला आहे. सदरील चालानवर तारीख सुध्दा दर्शविण्यात आलेली नाही. अशे जवळपास १०० ते १२५ चालान आहे ज्यावर नाव,पत्ता,सिटी सर्व्हे नंबर,तारीख नाही. यात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. चालान नंबर ३१४० जो की ५०००० आहे, ३१५०, ३००००चे चालान आहे. असे प्रचंड चालान तेथून वाटण्यात आले आहे. प्रशासनाने खुलासा करावा.

शहर अभियंता :मोबाईल टावारच्या बाबतीत वॉर्ड आफिसर मार्फत कारवाई करण्यास सुरवात झालेली आहे. त्यानंतर संचिका सादर करण्यास सुरवात केली आहे. २९८ टॉवर्सची यादी आहे.

मा.सभापती :कोणाकोणाचे चालान भरलेले आहे याचा तपशिल आहे काय?

शहर अभियंता :एकंदरीत कंपणीने किती पैसे भरले याबाबतीचा तपशिल आहे,

श्री.संजय जोशी :सर्व्हे नंबर नसल्या कारणाने सदरील चालान १० ठिकाणी वापरल्यास प्रशासन काय करेल. चालान वाटप कोणी केले आहे. चालान वाटपासाठी भरण्यासाठी मनपाने एजन्सी नेमलेली आहे.

मा.सभापती :सदरील चालान जेव्हा वाटप झाले त्यावेळी मा.शहर अभियंता नव्हते, अशे किती चालान वाटप झाले याची सविस्तर चौकशी करून येण्याऱ्या सभेपुढे ठेवण्यात यावे.

श्री.संजय जोशी :मा.शहर अभियंता यांनी एजन्सीची चौकशी करावी.

मा.सभापती :या प्रकरणी मनपाचे आर्थीक नुकसान करणारी बाब आहे, म्हणून या प्रकरणी श्री.काझी यांनी दोन दिवसांच्या आत चौकशी करून याबाबतचा अहवाल मा.शहर अभियंता यांचेकडे सादर करावा. मा.शहर अभियंता पुढील बैठकीत अहवाल सादर करतील.

श्री.कचरू सोनवणे :स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांनी ३ ते ४ महिण्यापूर्वी प्रश्न विचारला होता की, आंबेडकर चौक टि पॉईट या ठिकाणी सिग्नल लावण्यात यावे. त्यावेळी श्री.पानझडे यांनी सांगीतले की परवानगीसाठी पोलिसांकडे संचिका पाठविलेली आहे. सदरची परवानगी केव्हा मिळणार आहे, गेल्या महिण्यात सिग्नल अभावी एक २५ वर्षीय वाहुळ नामक युवक व कुल्फी

विक्री करणारा युवक अपघात होवून ठार झालले आहे. तरी सदरील ठिकाणी त्वरीत सिग्नल लावण्यात यावे.

श्रीमती जयश्री किवळेकर :रामगीरी हॉटेल जवळील सिग्नल अजून सुरू झालेले नाही त्याचाही खुलासा व्हावा.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता(श्री.पानझडे) :पोलिसांकडे मनुष्यबळ कमी आहे. तरीही सदरील प्रकरणाचे फॉलोअप करणे सुरू आहे, तसेच स.सदस्य श्री.सोनवणे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबतीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास फंड प्राप्त होताच त्वरीत काम सुरू होईल.

श्री.सिताराम सुरे :शरद हॉटेल टि पॉईट चौक होळकर चौक व आंबेडकर चौक येथे नेहमी वर्दळ असते तिथे अपघात होण्याचे प्रमाण वाढत आहे. कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, फंड प्राप्त होताच काम सुरू होईल तरी त्वरीत फंड उपलब्ध करून सिग्नलची व्यवस्था करण्यात यावी.

मा.सभापती :कार्यकारी अभियंता यांनी जातीने लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. फंडची गरज भासल्यास शहर अभियंता यांना निवेदन करून योग्य ती व्यवस्था करण्यात येईल.

श्री.अ.रशिद मामु :रोशन गेट ते किराडपुरा या रस्त्याचे काम त्वरीत करण्यात यावे. ते काम काम थांबले. जमीनीचा मोबदला न दिल्यामुळे थांबले. ४० फुटाचे पैसे दिले. ३० फुटाचे राहिले आहे.

मा.सभापती :या प्रकरणी तिन्ही कार्यकारी अभियंता आणि शहर अभियंता यांच्ेशी चर्चा झाली आहे. मनपाकडे जो निधी आलेला आहे त्यातुन तरतुद करून काम त्वरीत करण्यात येईल.

श्रीमती जयश्री किवळेकर :सिडको,हडको येथिल साफसफाई आता गुत्तेदारा मार्फत होते की बचत गटा मार्फत होते.

मा.सभापती :सिडको हडकोतील साफसफाईचे काम बचत गटाला देण्यात आलेले आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर :सिडको,हडको येथील साफसफाईची जबाबदारी कुठल्या अधिकाऱ्यांवर देण्यात आलेली आहे. बचत गटास कुठल्या अडीअडचणी आहेत हे जाणून घेतले पाहिजे. त्यांना कचरा उचलण्यासाठी गाडया नाहीत,घंटा गाडया नाहीत. ते गाडया वाढवून देण्यात याव्या.

मा.सभापती :आजच्या सभेस श्री.कांबळे साहेब व श्री.जावरे नाहीत, संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान सुरू आहे. कचरा उचलण्यासाठी घंटा गाडया बाबत कार्यकारी अभियंता श्री.डिपी.कुलकर्णी यांनी माहिती घ्यावी.

**<u>विषय क्र. १७३ :</u>**

दिनांक **२५/११/२००८** ची तहकूब व दि. **३/१२/२००८** रोजी संपन्न झालेल्या (का.प.क्र.**१६**), **०४/१२/२००८** (का.प.क्र.**१७**) आणि **२३/१२/२००८** (का.प.क्र.**१८**)रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक **२५/११/२००८** ची तहकूब व दि. **३/१२/२००८, ०४/१२/२००८** आणि **२३/१२/२००८** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १७४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन दल, पदमपुरा येथील परेड ग्राऊंडमध्ये काँक्रेटींग करणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.९,९८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मान्यता दिल्यानुसार उपरोक्त कामास्तव ई-निविदा विभागा मार्फत निविदा मागविण्यात आल्या असता एकुण ७ निविदा प्राप्त झाल्या होत्या. पैकी सर्वात कमी म्हणजेच आर.के. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.७७% कमी दराच्या निविदेच्या दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार संबंधीत गुत्तेदारास कार्यादेशही देण्यात आलेला आहे. प्रकरणी मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिलेल्या पत्रानुसार भविष्यामध्ये E.O.C. ची उभारणी केल्या नंतर या ठिकाणी सुमारे २० ते २५ टन क्षमतेच्या गाड्या येणार आहेत. तसेच परेड ग्राऊंडसाठीही याचा वापर करण्यात येणार आहे. करीता सदरील ठिकाणी ट्री मिक्स काँक्रेटींग चे प्रावधान करणेआवश्यक आहे. यासाठी लागणारा आवश्यक निधी हा आपतकालीन व्यवस्थापन या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येईल. करीता वाढीव कामासाठी सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम **रू.२,५१,२००/-** इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. मुळ अंदाजपत्रक रक्कम रू.९,९८,०००/- + **२,५१,२००** = १२,४९,२००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव सुधारीत अंदाजपत्रक एकुण रक्कम रू.१२,४९,२००/- व वाढीव अतिरिक्त बाबी या सदरील कामाचे मुळ गुत्तेदार मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने काम करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दल, पदमपुरा येथील परेड ग्राऊंडमध्ये काँक्रेटींग करणेच्या कामामध्ये ट्री मिक्स काँक्रेटींगचे प्रावधान करणे आवश्यक असल्यामुळे वाढीव कामासाठी रक्कम रू.२,५१,२००/- च्या वाढीव तसेच मुळ अंदाजपत्रक रक्कम रू.९,९८,०००/- + **२,५१,२००** = १२,४९,२००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव अतिरिक्त बाबी या सदरील कामाचे मुळ गुत्तेदार मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे/वि/इ व उबां) यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.५९ अंतर्गत मोहल्ला खोकडपुरा येथील औरंगाबाद हॉस्टेल समोरील व बंजारा कॉलनी चौकातील महाराणा प्रताप हॉस्टेल जवळील ड्रेनेज लाईन बदलणेच्या कामासाठी दरसुची २००७-०८ नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.२,९८,२००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी ड्रेनेज समस्या व प्राप्त तक्रारी पाहता सदर काम तातडीने करणे आवश्यक आहे. करीता सदर काम तातडीने करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ च्या कलम (२) पोटकलम २ नुसार सदर कामाच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी मा.आयुक्त यांनी मंजुरी/शिफारस केलेली आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प २००८-०९ मधील देखभाल दुरूस्ती जलनिःसारण या लेखा शिर्षका अंतर्गत पान क्र. १५२ अनुक्रमांक ३४ नुसार उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतुन सदर काम प्रस्तावित आहे. करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ च्या कलम (२) पोटकलम २ नुसार काम अंदाजपत्रकीय दराने विना निविदा करण्याच्या मान्यतेच्या विचारार्थ सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर सदर काम उपलब्ध एजन्सी श्री. प्रशांत व्ही. पवार यांच्याकडून करून घेण्यात येईल. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५९ अंतर्गत मोहल्ला खोकडपुरा येथील औरंगाबाद हॉस्टेल समोरील व बंजारा कॉलनी चौकातील महाराणा प्रताप हॉस्टेल जवळील ड्रेनेज लाईन बदलण्याचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ च्या कलम (२) पोटकलम २

नुसार काम अंदाजपत्रकीय दराने विना निविदा उपलब्ध एजन्सी श्री. प्रशांत व्ही. पवार यांच्याकडून करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६ :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत किटकनाशक व अळीनाशक फवारणी व फॉगींगसाठी प्रभाग क्र.१ ते ६ साठी ई-टेंडर द्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील निविदा दिनांक २८-९-२००७ रोजी उघडण्यात आल्या होत्या व मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार १ जुलै २००८ ते ३० सप्टेंबर २००८ या तीन महिन्याच्या कलावधीकरीता प्रभाग निहाय खालील कंत्राटदारांना मुदतवाढ देण्यात आली होती.

| प्रभाग क्रमांक | कंत्राटदाराचे नांव | प्रभागाची किंमत रूपये | लावलेली बोली रूपये | एकूण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | भारत पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| २. | सचिन पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ३. | आर.डी. पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ४. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ५. | निलेश पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ६. | ओंकारेश्वर सुशिक्षित बेरोजगार संस्था | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| | एकूण - | | | **६,०३,१३२/- प्रति माह** |

**(सहा महिन्याची एकूण रक्कम रू.३६,१८,७९२/-)**

वरील कंत्राटदारांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक ३० सप्टेंबर २००८ रोजी संपलेली आहे. परंतु नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता, पुर्वीच्याच दराप्रमाणे वरील कंत्राटदारांमार्फत सदरील काम करून घेण्यासाठी १ ऑक्टोबर २००८ ते ३१ मार्च २००९ या सहा महिन्यांची मुदतवाढीची कार्योत्तर मंजुरी घेण्यासाठी स्थायी समिति सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत किटकनाशक व अळीनाशक फवारणी व फॉगींगसाठी प्रभाग क्र.१ ते ६ साठी प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यानुसार पुर्वीच्याच दराप्रमाणे वरील कंत्राटदारांमार्फत सदरील काम करून घेण्यासाठी १ ऑक्टोबर २००८ ते ३१ मार्च २००९ या सहा महिन्यांची मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७७ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड- **ब** व **क** प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असलेल्या ब्लिचींग पावडर ग्रेड-१ चा पुरवठा करण्यासाठी र.रू.३२,४९,०००/- चे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२८७ दि.२०/९/०८ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे.

वार्षिक ब्लीचींग पावडर ग्रेड-१ चा पुरवठा करण्यासंबंधी ई-निविदा विभागा मार्फत निविदा प्रक्रिया करण्यात आली. निविदा प्रक्रिये अंतर्गत या पुरवठ्या करीता एकुण तीन निविदा विक्री झाल्या व शेवटच्या दिवशी दर भरलेल्या एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१. क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा - रू.१२,६९०/- प्र.मे.टन
२. एस.व्ही.एस.केमीकल कॉर्पोरेशन पुणे - रू.१२,७५०/- प्र.मे.टन
३. फोनिक्स केमीकल्स, औरंगाबाद - रू.१२,९९८/- प्र.मे.टन

प्राप्त दरांपैकी मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांचे दर सर्वात कमी म्हणजेच रू.१२६९०/- प्र. मे. टन असे आहेत. वाटाघाटीअंती क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा यांनी सुधारीत दराचे पत्र देऊन रू.१२६००/- प्र.मे.टन या दराने पुरवठा करण्याची तयारी दर्शविली होती. मा.शहर अभियंता यांचे तजविजीनुसार मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांनी पुन्हा दर कमी करून सुधारीत दर रू.१२५७०/- प्र.मे.टन असे दर दिलेले आहेत. या दराने खरेदी केल्यास पुरवठ्या करीता खालील प्रमाणे खर्च येईल.

१७१.०० मे.टन x रू.१२५७०/- प्र.मे.टन = रू.२१,४९,४७०/-

तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा प्राप्त दर हे ३३.८४% कमी दराचे आहे. मा.आयुक्त यांनी सदरच्या दराने खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याची शिफारस केली आहे.

करिता मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा यांची ब्लिचींग पावडर ग्रेड-१ च्या वार्षिक पुरवठ्याची निविदा रू.१२५७०/- प्र.मे.टन या दराने रक्कम रू.२१,४९,४७०/- च्या खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असलेल्या ब्लिचींग पावडर ग्रेड-१ चा पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा यांची रक्कम रू.१२५७०/- प्र.मे.टन या दराची निविदा स्विकारणेस व त्यानुसार र.रू.२१,४९,४७०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १७८ :</u>**

कार्यकारी अभियंता (ड्रे/वि/इ व उ.बां.) महानगरपपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, बीबी का मकबरा पाठीमागे मो. पहाडसिंगपुरा भागातील कला हौ.सो., विद्याविहार, संभाजी कॉलनी, थत्ते ले-आऊट कॉलनी, ग्रंथालय कॉलनी, निपट निरंजन कॉलनी, नर्सेस हौ.सो. ह्या वसाहती मंजूर रेखांकनातील असून १००% विकास खर्च भरलेला आहे. ह्या वसाहतीस मलनिःसारण वाहिनीची व्यवस्था नाही. सदर वसाहतीतील ड्रेनेज Disposal करीता मुख्य सिव्हर लाईन नसल्यामुळे नाल्यात मुख्य सिव्हर लाईन टाकणेचा प्रस्ताव आहे.

सदर प्रकरणी मोहल्ला बेगमपुरा, विद्युत कॉलनी ते कला हौ. सोसायटी पर्यंत नाल्यात ५०० मी.मी. व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी सन २०००-०१ च्या म.जी.प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार रक्कम रू.२१,६७,९१०/- चे प्रथम अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची दि.८/४/२००३ रोजी मंजुरी प्राप्त झाली आणि त्यास दि.२७/५/२००३ च्या मा.स्थायी समितीमध्ये विषय क्र.७५ अन्वये मान्यतेचा ठराव झाला. त्यानंतर निविदा कार्यवाही होऊन उपरोक्त कामाच्या एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या, पैकी सर्वात कमी मे.हुमा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७७% जास्त दराच्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ८.००% कमी दराने मंजुरी मिळाली आणि कार्यादेश जा.क्र.मनपा/जलनिःसारण/९१८/२००३, दि.११/१२/२००३ अन्वये ठेकेदार मे.हुमा कन्स्ट्रक्शन यांचे कडून काम हाती घेतले. कामाची मुळ मुदत १२ महिने दि.१०/१२/२००४ पर्यंत होती. त्यानंतर दि.३१/५/२००५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली, वाढीव मुदतीत काम पूर्ण होऊ शकले नाही. विहित कालावधीमध्ये झालेल्या कामाचे दोन दरम्यानचे देयक प्रथम र.रू.२,०५,८२८/- दि.२३/९/२००४ व द्वितीय र.रू.२,७३,२४०/- दि.३१/३/२००५ असे एकूण र.रू.४,७९,०६८/- मे. हुमा कन्स्ट्रक्शन यांना अदा करण्यात आले. निविदा रक्कमेच्या सुमारे २५% काम झाले. उर्वरीत सुमारे ७५% काम पूर्ण करण्यास संबंधीत ठेकेदारास कार्यालयाकडून वारंवार कळविण्यात आले असता त्यांनी पत्रांना प्रतिसाद दिला नाही. तसेच त्यांचे घरच्या पत्त्यावर प्रतिनिधीस पाठविण्यात आले असता देखील त्यांचे घरी प्रतिसाद दिला नाही. मे.हुमा कन्स्ट्रक्शन यांनी काम पूर्ण न केल्यामुळे त्यांची अनामत रक्कम जप्त करून त्यांना काळया यादीत (Black List) मध्ये टाकण्यात आले आहे. तसेच त्यांना अदा केलेली वरील नमूद र.रू.४,७९,०६८/- व्यतिरिक्त त्यांनी द्वितीय देयकानंतर केलेल्या कामाचा मोबदला त्यांना अदा न करता ती बिलाची रक्कम जप्त करून प्रकरण आहे त्या स्थितीत अंतिम करण्यात आले आहे.

त्यानंतर निविदा स्पर्धेतील द्वितीय व तृतीय क्रमांकाचे कंत्राटदार यांना उर्वरीत काम मंजूर निविदा दराप्रमाणे करण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी देखील प्रतिसाद न दिल्याने शिल्लक काम पूर्ण करणेसाठी उर्वरीत र.रू.१३,६४,०८६/- ची फेर निविदा तीन वेळा प्रसिध्द करण्यात आली. तीन्ही वेळेस एकही निविदा दर भरून प्राप्त झाली नाही.

त्यामुळे ठरल्यानुसार उर्वरीत काम पुर्ण करून घेणेसाठी प्रचलीत दरसुची सन २००६-०७ नुसार रक्कम रू.१७,८३,८६६/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास दि.५/१/२००८ रोजी मा.आयुक्त महोदयांची मान्यता प्राप्त झाली आहे.

मे.हुमा कन्स्ट्रक्शन यांनी पूर्ण न केलेल्या कामापैकी उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी सन २००६-०७ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले सुधारित अंदाजपत्रक र.रू.१७,८३,८६६/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव आणि निविदा बोलावून स्पर्धेतून येणाऱ्या नविन एजन्सी मार्फत उर्वरीत काम पूर्ण करणेच्या मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यास विषय क्र.३७७/- दि.२८/२/२००८ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यानंतर निविदा सुचना जा.क्र.मनपा/ड्रेनेज/१५७/२००८ दि.२४/३/२००८ अन्वये निविदा बोलविण्यात आल्या असता चौथ्या वेळेसही एकही निविदा दर भरून प्राप्त झालेली नाही.

जे काम स्थळावर झालेले आहे ते अर्धवट स्थितीत आहे. त्यापुढील भागातून मलनि:सारण/ड्रेनेजचे पाणी उघड्यावरून वहाते त्यामुळे परिसरातील नागरीकांच्या तक्रारी येत आहेत. नागरीकांच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने उर्वरीत भागात ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे. प्रकल्प पुर्ण करून त्याचा उपयोग होणेसाठी उर्वरीत वाहिनीचे काम पूर्ण होणे आवश्यक असल्यामुळे आणि स्पर्धात्मक निविदाद्वारे कोणतीही एजन्सी दर भरून निविदा सादर करीत नसल्यामुळे हे काम उपलब्ध कंत्राटदाराकडून करून घेणेस कंत्राटदारांना विचारणा केली असता २००६-०७ च्या दरसुचीवर ७८.६५% जास्त दराने काम करण्यास फक्त एक कंत्राटदार **उदय इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद** यांनी संमती दर्शविली आहे.

सदर काम करून घेणेसाठी मुं.प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड, प्रकरण ५ चे नियम (२) (२) नुसार स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेस मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.

चालू डीएसआर सन २००८-०९ प्रमाणे या उर्वरीत कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.२५,५७,१८१/- आहे. कंत्राटदार उदय इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांनी ऑफर केलेली रक्कम रू.३१,८६,९२२/- आहे. त्यांची ही ऑफर सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकावर ७८.६५% जास्त आहे आणि चालू डीएसआर नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकावर २४.६२% जास्त आहे.

सदर कामासाठी लागणाऱ्या पाईपच्या दराची तुलना दरसुची २००६-०७ च्या दराशी केली असता खुल्या बाजारातील दर २४.४३% जास्त आहे.

तरी कंत्राटदार यांनी ऑफर केलेले दर ७८.६५% जास्त आणि त्यानुसार येणारा कामाचा खर्च रक्कम रू.३१,८६,९२२/- मान्यतेच्या निर्णयास्तव सादर.

या कामासाठी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात मेन सिव्हर लाईन या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.W-६२ वर अ.क्र. २ नुसार रू.१७.८५ लक्ष तरतुद आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यास उर्वरीत अपेक्षीत रक्कम सुधारीत अर्थसंकल्पात उपलब्ध होणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीबी का मकबरा पाठीमागे मो. पहाडसिंगपुरा भागातील १००% विकास खर्च भरलेल्या कला हौ.सो., विद्याविहार, संभाजी कॉलनी, थत्ते ले-आऊट कॉलनी, ग्रंथालय कॉलनी, निपट निरंजन कॉलनी, नर्सेस हौ.सो. ह्या मंजूर रेखांकनातील वसाहतीतील ड्रेनेज Disposal करीता नाल्यात मुख्य सिव्हर लाईन टाकणेच्या प्रस्तांवातर्गत, अर्धवट काम पुर्ण करणेसाठी उर्वरीत भागात ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आवश्यक असल्यामुळे आणि स्पर्धात्मक निविदाद्वारे कोणतीही एजन्सी दर भरून निविदा सादर करीत नसल्यामुळे हे काम उपलब्ध कंत्राटदार उदय इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांनी ऑफर केलेले दराने म्हणजेच २००६-०७ च्या दरसुचीवर ७८.६५% जास्त दराने त्यांचेकडून मुं.प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड, प्रकरण ५ चे नियम (२) (२) नुसार काम करून घेण्यास व त्यासाठीच्या रक्कम रू.३१,८६,९२२/- च्या खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, चाणक्यपुरी ते शंभुमहादेवनगर ५० फुट विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००७-२००८

च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१४,९९,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००८-०९ या आर्थिक वर्षात नविन डांबरी रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रू.१४,९९,७००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चाणक्यपुरी ते शंभुमहादेवनगर ५० फुट विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९९,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८० :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड **इ** व **फ**) यांनी प्रस्ताव दिला की, वॉर्ड क्र.९६ येथील जुन्या पुलाची उंची वाढविणे या कामाकरीता सन २००७-०८ च्या सा.बां. खात्याच्या दरसुची नुसार रक्कम रू.३२,०६,१३६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाकरीता सन २००८-२००९ च्या अंदाजपत्रकात पृ.क्र.०४ अ.क्र.२५ वर रू.२०.०० लक्ष तरतुद व डब्ल्यु जी.बी.- ०६ वर १०.०० लक्ष अशी एकुण ३० लक्षची तरतुद "नवीन खडी रस्ते कल्व्हर्ट" या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध आहे.

करीता सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३२,०६,१३६/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९६ येथील जुन्या पुलाची उंची वाढविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३२,०६,१३६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८१ :**

कार्यकरी अभियंता, पाणी पुरवठा प्रस्ताव सादर करीत आहेत की, एन-२ मायानगर, अभिनव सोसायटी, सिडको अंतर्गत १०० व १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.९,९८,५१०/- चे एम.जे.पी.डी.एस.आर. सन २००५-०६ नुसार तयार करण्यात आलेले होते. सदर कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१९,९४,६३०/- एम.जे.पी. चे डीएसआर सन २००८-०९ नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम सन २००८-०९ चे अर्थसंकल्पात भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षकात डब्ल्यु-७९ अ.क्र.५४ वर तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

तरी एन-२ मायानगर अभिनव सोसायटी या ठिकाणी १०० व १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१९,९४,६३०/- चे मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-२ मायानगर, अभिनव सोसायटी, सिडको अंतर्गत १०० व १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९४,६३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५०, मो.सुराणानगर भागात सेव्हनहिल परिसराच्या उंच भागावरील, पावसाळ्यात पावसाचे सांडपाणी मोठ्या प्रमाणात खाजगी जमीन मिळकत न.भु.क्र.१२३६९/१०४, मोतीवालानगर यामधून नैसर्गिक प्रवाहाने वाहात होते. जमीन मालकाने सदर भूखंड माती भराव टाकून विकसीत केल्याने पावसाचे सांडपाणी वाहण्याचा प्रवाह बंद पडले असता पावसाचे सांडपाणी सुराणानगर मधील सखल भागातील नागरीकांच्या घरात शिरून जीवीत व आर्थिक हानी होण्याची संभावना लक्षात घेता सदर ठिकाणची संयुक्त स्थळ पाहणी मा.महापौर, मा.आयुक्त महोदय, सदर वॉर्डाचे स.नगरसेवक व सर्व संबंधीत नागरीकां समक्ष झाली. प्रत्यक्ष स्थळी सखोल चर्चा, चौकशी अंती सुराणानगर सखल भागातील सांडपाणी सदर भूखंडाच्या शेजारील सुराणानगर या मंजूर रेखांकनातील रस्त्यालगत आर.सी.सी. गटार बांधुन सांडपाणी काढुन देणे अनिवार्य असल्याचे निदर्शनास आल्याने वॉर्ड क्र.५०, मो.सुराणानगर भागात रस्त्यालगत आर.सी.सी.सरफेस गटार बांधणे

या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२९,९०,०००/- चे म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे. उपरोक्त काम अर्थसंकल्प २००८-०९ मध्ये पान क्र.डब्ल्यु-५९, अ.क्र.१८ वरील ३०.०० लक्षची तरतूद लेखाशिर्ष शहरी भागात खुल्या गटारी बांधणे, या तरतुदीमधून प्रस्तावित केले आहे. सदरील प्रस्तावास मा.आयुक्त महोदय यांची दि.३/५/२००८ रोजी मान्यता प्राप्त झाली असून मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.२८२, दि.२०/८/२००८ मध्ये मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार ई-टेंडरींग विभागामार्फत सदरील कामाची निविदा मागविले असता ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त निविदा बाबतचा अहवालमध्ये नमुद नुसार एकूण दोन निविदा विक्री झाल्या व स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. संतोष चव्हाण | ३.९११% कमी दराने |
| २. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | ३.८६% कमी दराने |

उपरोक्त नुसार सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९११% कमी दराची निविदा श्री.संतोष चव्हाण यांची असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे. करीता प्रस्ताव श्री.संतोष चव्हाण, यांची ३.९११% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५०, मो.सुराणानगर भागात सेव्हनहिल परिसराच्या उंच भागावरील, पावसाळ्यात पावसाचे सांडपाणी सुराणानगर मधील सखल भागातील नागरीकांच्या घरात शिरून जीवीत व आर्थिक हानी होण्याची संभावना लक्षात घेता सखल भागातील सांडपाणी सदर भूखंडाच्या शेजारील सुराणानगर या मंजूर रेखांकनातील रस्त्यालगत आर.सी.सी. गटार बांधुन सांडपाणी काढुन देणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९११% कमी दराची श्री. संतोष चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ चे कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने दर निश्चिती प्रत्येकी वर्षाच्या २० फेब्रुवारी २००९ पूर्वी करणे आवश्यक आहे.

**त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अशंतः दुरूस्ती करून सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे दर सन २००९-२०१० करीता कायम करणे योग्य.**

सन २००९-२०१० मध्ये कर आकारणी करणेसाठी पुर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक असे चार गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे ...

**अ. निवासी** :- राहते घर, अनुदानीत शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था तसेच माहिति तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

**ब. निवासेत्तर** :- धर्मादाय संस्था, शाळा, वस्तीगृहे, महाविद्यालये, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था, वकीलाचे कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, कर सल्लागार तत्सम.

**क. व्यावसायीक** :- ०१. पेट्रोलपंप, हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने, कोचिंग क्लासेस्, हॉस्पीटल्स्, विना अनुदानीत (देणगी घेणारी) शाळा-कॉलेज तसेच ज्या इमारती भाडयाने घेतलेल्या असेल त्या इमारती भाडे कराराप्रमाणे, तत्सम.

०२. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार कर आकारणी करणे किंवा टॉवरचे रचना / उंची नुसार जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारणे योग्य.

**ड. औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील प्रमाणे मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे आहे.

| **सामान्य कर** | **सध्याचे दर** | **प्रस्तावित दर** |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त **अ** प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त **ब** प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त **क** प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त **ड** प्रमाणे) | मागील वर्षाच्या दराने | मागील वर्षाच्या दराने |

**इ. नामांतर शुल्क** :- ०१. खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे, शिध्द शिघ्र गणकाप्रमाणे (Ready Reckner) किंवा बाजार मुल्य यामध्ये जे जास्त असेल त्याच्या ०.५% नामांतर शुल्क आकारण्यात येतील.

०२. **वारसाहक्काने** :- बक्षीसपत्र, वाटणीपत्र, दान, देणगी, मृत्युपत्र व तत्सम मार्गाने हस्तांतर केलेला असल्यास, स्लम (घोषीत झोपडपट्टी) व गुंठेवारी क्षेत्र यांना रू.१०००/- नामांतर शुल्क आकारण्यात येतील.

**फ. विलंब शुल्क** :- औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील थकीत मालमत्ता कराची वसूली प्रभावीपणे होण्यासाठी व महानगरपालिकेची वसूलीत वाढ व्हावी म्हणुन थकीत मालमत्ता करावर विलंब शुल्क १०% आकारण्यात येतील.

**सुट** :- ०१. दोन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर (चालु आर्थिक वर्षाचा वगळुन) भरणाऱ्यास सामान्य करात १०% सूट ही पुढील वर्षाच्या दर निश्चितीच्या दरास अधिन राहुन देण्यात येईल.

०२. जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट देण्यात येईल.

०३. जे मालमत्ताधारक चालु वर्षाच्या खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च सूट अनुज्ञेय होणार नाही व थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

०४. मागील वर्षाप्रमाणेच चालु आर्थिक वर्षात देखील माजी सैनिकांना तसेच स्वातंत्र्य सैनिकांना नियमाप्रमाणे सामान्य करात सूट दिली जाईल.

०५. ग्रुप हौसिंग स्किम किंवा रो-हाऊसेस् स्किम जे विकासक स्वः खर्चाने विकास करतील अशा स्किम / योजनाला मागील वर्षाप्रमाणे सामान्य करात ५०% सूट देय राहील.

**सन २००८-०९ मधील कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालीलप्रमाणे दर कायम करणे योग्य राहतील :-**

**निवासी वापर असलेल्या इमारतीस दरः-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.९.५०/- | रू.८.५०/- | रू.७.५०/- | रू.६.५०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.७.५०/- | रू.७.००/- | रू.६.५०/- | रू.५.५०/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.६.५०/- | रू.६.००/- | रू.५.५०/- | रू.३.५०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.४.००/- | रू.२.५०/- | रू.१.२५/- | रू.१.००/- |

**निवासेत्तर वापर असलेल्या इमारतीस दर :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२४/- | रू.२२ /- | रू.२१/- | रू.२०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८/- | रू.१६ /- | रू.१४/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.६/- | रू.३.२५/- | रू.३/- |

मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २००९-१० साठी सन २००८-०९ चे प्रचलित दर कायम करणे योग्य, ते पुढील प्रमाणे :-

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन ०८-०९ चे प्रचलित दर | सन २००९-२०१० साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |

अधिकृत मोकळया जागेवरील (मंजुर रेखांकनातील) कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल. तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारणे योग्य.

करीता वरील प्रमाणे कर आकारणीसाठी करण्यात आलेल्या गटास व सध्याचे प्रचलित दर सन २००९-२०१० साठी कायम करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशिद मामु : .५% च्या ऐवजी १००० रूपये लावण्यात यावे.

फ) मालमत्तेच्या करावर विलंब शुल्क १०% आकारण्यात येतो, महानगरपालिकेत बायलॉज् तयार झालेले नाही. ते तयार करावे. वॉटर सप्लाय आणि टॅक्सचा बायलॉज आहे. १० टक्के ऐवजी ५ टक्के करण्यात यावा.

श्री.संजय जोशी :इतर महानगरपालिकेमध्ये नामांतर शुल्क जास्त आकारले जात नाही परंतु औरंगाबादमध्ये नामांतर शुल्क सर्वात जास्त आकारले जाते. सुरवातीस ५०० रूपये नामांतर शुल्क होते, प्रशासनाने नजर चुकीने मंजूर करून घेतले त्यानंतर अशासकीय ठराव टाकल्यानंतर तो शासनाकडे पाठविण्यात आला. १०००रूपये नामांतर शुल्क आकारण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी :विषय क्रं.१८३ मध्ये इ.मध्ये १ व २ अशे दोन भाग केले आहे १ मध्ये ०.५% ऐवजी सरसगट १००० रूपये ठेवण्यात याव व नांमातर शुल्क १००० रूपये ठेवण्यात यावा. तसेच फ मध्ये विलंब शुल्क १० टक्के ऐवजी ५ टक्के आकारण्यात यावा.

मा.सभापती :विषय क्रमांक १८३ मध्ये नामांतर शुल्क १००० ठेवण्यात यावा म्हणून स्थायी समितीच्या सदस्यांचे मत आहे. विलंब शुल्क १० टक्क्या ऐवजी ५ टक्के करण्यात यावे. विषय क्रमांक १८३ दुरूस्तीसह सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याची शिफारस करीत आहे.

श्री.अ.रशिद मामु :जी सुट देण्यात आली आहे त्याचे आदेश वेळेत पोहचत नाही त्यामुळे नागरीकांना जास्त पैसे भरावे लागते. तरी मार्चमधेच आदेश दिले गेले पाहिजे.

श्री.रविकांत गवळी :१८३ मंजूर करण्यास हरकत नाही.सिडको हडको मध्ये मालमत्ता कर कुठला आकारण्यात येईल. सिडको हस्तांतरणाच्या वेळी श्रीयुत टोपे साहेब यांच्याशी चर्चा करून सिडकोचे दर वेगळे ठेवण्यात आले होते. सिडको हडकोसाठी जी विशेष बैठक झाली होती त्यात Particular एकच दर ठेवण्यात आला होता.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी :प्रस्ताव सादर करत असतांना सिडको हडको किंवा महानगरपालिका असा वेगळा भेदभाव करण्यात आलेला नाही त्यादृष्टीने प्रस्ताव समोर ठेवलेला आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर :सिडको हडको असा इथे जरी उल्लेख केला नसेल तरी शहरातील सगळया प्रापर्टीचे मालकांना जाणुन घेण्याचा अधिकार आहे. सिडको हडको लिजवर आहे. त्यामुळे सिडको हडको वासीय नागरीक ते भरण्यास तयार होणार नाही. शहरातील जनतेला मालकी हक्क भेटलेला आहे.

मा.सभापती :सर्व साधारण सभेने मान्यता दिलेली आहे. मा.आयुक्त यांनी मान्य केलेले नाही.

श्री.रविकांत गवळी :सिडको हडको मनपात हस्तांतरण झाल्यावर जो करार झाला आहे तो मान्य करणे गरजेचे आहे. सदरचा करार मान्य म्हणुनच हस्तांतरण झाले आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर :सिडको हडको आणि शहराचा कर वेगळा लावला जातो. ९.५० टक्के भरण्यास काही हरकत नाही परंतु ती मालमत्ता आमच्या मालकीची नाही. मालमत्ता आमची नसल्या कारणाने ६.५० प्रमाणे जो रेट देतात. सिडकोचा आणि शहराचा कर वेगळा लावण्यात येतो.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :याबाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेत घेण्यात येईल. |
| श्री.मोहन मेघावाले | :मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा केला आहे की, सिडको हडको आणि शहरात भेदभाव ठेवला नाही. |
| मा.सभापती | :मालमत्ता अधिकारी कर आकारत नाही. पहिला मुद्दा स्पष्ट केला आहे की, ॲडव्हान्स पैसे भरतील त्यांना ५% आणि दुसरा मुद्दा स्पष्ट केला की, सुट देण्याचे आदेश त्वरीत वॉर्डाला देण्यात येतील. तिसरा नामांतर शुल्काचा आहे. सदर प्रस्तावात स्पष्ट उल्लेख केला आहे की, वरील प्रमाणे कर आकारणीसाठी करण्यात आलेल्या गटास व सध्याचे प्रचलित दर सन २००९-२०१० साठी कायम करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर करण्यात येत आहे. अंतिम निर्णय सर्वसाधारण सभा घेणार आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :रूलिंग देतांना स्पष्ट उल्लेख करण्यात यावा की, सदरील प्रस्तावामध्ये सिडको, हडको संदर्भात काहीही उल्लेख केलेला नाही. |
| मा.सभापती | :स्थायी समितीने याबाबत तिन शिफारशी केलेल्या आहे, प्रथम नामांतरासाठी १००० रूपये, नामांतर शुल्क ५ टक्के तसेच जे ॲडव्हान्स टॅक्स भरतात त्यांना वॉर्डात आदेश जात नाही जे जायला पाहिजे. त्या संदर्भात, सर्वसाधारण सभेला शिफारस केलेली आहे. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर "प्रस्तावातील अ.क्र. **इ** नामांतर शुल्क मध्ये खरेदी विक्री किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या कागदपत्रा आधारे नामांतरणासाठी ०.५% नामांतर शुल्क आकारणे ऐवजी इ-नामांतर शुल्क अ.क्र.१ व २ साठी फक्त रू.१०००/- नामांतर शुल्क आकारणी करण्यास आणि **फ-** विलंब शुल्क मध्ये थकीत मालमत्ता करावर विलंब शुल्क १०% ऐवजी ५% आकारणी करण्यास आणि **सुट** मध्ये **अ.क्र.१, २, ३** च्या संदर्भात प्रशासनाने देय सुटबद्दल माहे मार्च-२००९ मध्ये आदेश पारीत करून सर्व प्रभाग (वॉर्ड) कार्यालयांस देण्यात यावे." इत्यादी दुरूस्तीसह प्रस्तावित कर आकारणीसाठी करण्यात आलेल्या गटास व सध्याचे प्रचलित दर सन २००९-२०१० साठी कायम करण्यास मंजुरी देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात येते.

**अ. निवासी** :- राहते घर, अनुदानीत शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था तसेच माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

**ब. निवासेत्तर** :- धर्मादाय संस्था, शाळा, वस्तीगृहे, महाविद्यालये, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था, वकीलाचे कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, कर सल्लागार तत्सम.

**क. व्यावसायीक** :- ०१. पेट्रोलपंप, हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने, कोचिंग क्लासेस्, हॉस्पीटल्स्, विना अनुदानीत (देणगी घेणारी) शाळा-कॉलेज तसेच ज्या इमारती भाडयाने घेतलेल्या असेल त्या इमारती भाडे कराराप्रमाणे, तत्सम.

०२. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार कर आकारणी करणे किंवा टॉवरचे रचना / उंची नुसार जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारणे योग्य.

**ड. औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील प्रमाणे मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे आहे.

| सामान्य कर | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त **अ** प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त **ब** प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त **क** प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त **ड** प्रमाणे) | मागील वर्षाच्या दराने | मागील वर्षाच्या दराने |

**इ. नामांतर शुल्क** :- ०१. खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे, शिध्द शिघ्र गणकाप्रमाणे (Ready Reckner) किंवा बाजार मुल्य यामध्ये जे जास्त असेल त्याच्या ०.५% ऐवजी रू.१०००/- नामांतर शुल्क आकारण्यात यावे.

०२. **वारसाहक्काने** :- बक्षीसपत्र, वाटणीपत्र, दान, देणगी, मृत्युपत्र व तत्सम मार्गाने हस्तांतर केलेला असल्यास, स्लम (घोषीत झोपडपट्टी) व गुंठेवारी क्षेत्र यांना रू.१०००/- नामांतर शुल्क आकारण्यात येतील.

**फ. विलंब शुल्क** :- औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील थकीत मालमत्ता कराची वसूली प्रभावीपणे होण्यासाठी व महानगरपालिकेची वसूलीत वाढ व्हावी म्हणुन थकीत मालमत्ता करावर विलंब शुल्क १०% ऐवजी ५% आकारण्यात यावेत.

**सुट** :- ०१. दोन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर (चालु आर्थिक वर्षाचा वगळुन) भरणाऱ्यास सामान्य करात १०% सूट ही पुढील वर्षाच्या दर निश्चितीच्या दरास अधिन राहुन देण्यात येईल. याबाबत मार्च-२००९ मध्ये आदेश पारीत करून सर्व प्रभाग कार्यालयांस देण्यात यावे.

०२. जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट देण्यात येईल.

०३. जे मालमत्ताधारक चालु वर्षाच्या खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च सूट अनुज्ञेय होणार नाही व थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

०४. मागील वर्षाप्रमाणेच चालु आर्थिक वर्षात देखील माजी सैनिकांना तसेच स्वातंत्र सैनिकांना नियमाप्रमाणे सामान्य करात सूट दिली जाईल.

०५. ग्रुप हौसिंग स्किम किंवा रो-हाऊसेस् स्किम जे विकासक स्वः खर्चाने विकास करतील अशा स्किम / योजनाला मागील वर्षाप्रमाणे सामान्य करात ५०% सूट देय राहील.

**सन २००८-०९ मधील कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालीलप्रमाणे दर कायम करणे योग्य राहतील :-**

**निवासी वापर असलेल्या इमारतीस दरः-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.९.५०/- | रू.८.५०/- | रू.७.५०/- | रू.६.५०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.७.५०/- | रू.७.००/- | रू.६.५०/- | रू.५.५०/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.६.५०/- | रू.६.००/- | रू.५.५०/- | रू.३.५०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.४.००/- | रू.२.५०/- | रू.१.२५/- | रू.१.००/- |

**निवासेत्तर वापर असलेल्या इमारतीस दर :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२४/- | रू.२२ /- | रू.२१/- | रू.२०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८/- | रू.१६ /- | रू.१४/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.६/- | रू.३.२५/- | रू.३/- |

मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २००९-१० साठी सन २००८-०९ चे प्रचलित दर कायम करणे योग्य, ते पुढील प्रमाणे :-

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन ०८-०९ चे प्रचलित दर | सन २००९-२०१० साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |

अधिकृत मोकळया जागेवरील (मंजुर रेखांकनातील) कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल. तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारणे करीता वरील प्रमाणे कर आकारणीसाठी करण्यात आलेल्या गटास व सध्याचे प्रचलित दर सन २००९-२०१० साठी कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती :ऐनवेळेचे काही प्रस्ताव आलेले आहेत. जकात खाजगीकरण प्रस्ताव सोडून बाकीचे प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

श्री.वसंत नरवडे :ऐनवेळेच्या प्रस्तावामध्ये १५ लाखाचे काम झालेले टेंडर पास करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्य यांच्या प्रस्तावासह ऐनवेळेच्या प्रस्तावांस मान्यता देण्यात येते.

: ऐनवेळचे विषय :

**विषय क्र. १८४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे, वि इ व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-अ** मधील वॉर्ड क्र.१, ४, ५, ६, ८, ९, १०, ११, १२, १३, ३०, ३१, ३२, ३४, ३५ (एकुण १६ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२७,०२,८००/- चे सन २००६-०७ आणि २००७-०८ च्या मूळ अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराने तयार करण्यात आले असुन त्यास दिनांक २०-११-२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.३५७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना (दुसरी वेळ) जा.क्र.मनपा/ई/निविदा/१३८/०९ दिनांक ३-१-२००९ प्रसिध्द करण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकुण तीन निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांक पर्यंत तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.१४-१-२००९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.असन्सो लाइटस्, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा २२.५१% जास्त दराने |
| २. | मे. ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती | अं.प.दरापेक्षा २४.२% जास्त दराने |
| ३. | मे. आकाश इलेक्ट्रीकल, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा २६.५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५१% जास्त दराने मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची निविदा आहे. सदर निविदेच्या दराची चालू दरसुची (सा.बां.विद्युत ०८-०९) नुसार तुलना केली असता हे दर चालू दरसुची प्रमाणे १६.४१% कमी येतात.

करीता मे. असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची २२.५१% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-अ** मधील वॉर्ड क्र.१, ४, ५, ६, ८, ९, १०, ११, १२, १३, ३०, ३१, ३२, ३४, ३५ (एकुण १६ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक **मे. असन्सो लाईटस, औरंगाबाद** यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५१% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८५ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे, वि इ व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-ब** मधील वॉर्ड क्र.२, ३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २४, २५, २६, ४७, ४८, ४९ (एकुण १७ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२५,२६,५१०/- चे सन २००६-०७ आणि २००७-०८ च्या मूळ अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराने तयार करण्यात आले असुन त्यास दिनांक २०-११-२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.३५७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना (दुसरी वेळ) जा.क्र.मनपा/ई/निविदा/१३८/०९ दिनांक ३-१-२००९ प्रसिध्द करण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकुण पाच निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांक पर्यंत चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.१४-१-२००९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आकाश इलेक्ट्रीकल, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा २३.७% जास्त दराने |
| २. | मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती | अं.प.दरापेक्षा २७% जास्त दराने |
| ३. | मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा ३०.५१% जास्त दराने |
| ४. | मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनीक्स | अं.प.दरापेक्षा २५.२१% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| | औद्योगीक सह. संस्था लि.औरंगाबाद | |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७% जास्त दराने मे.आकाश इलेक्ट्रीकल, औरंगाबाद यांची निविदा आहे. सदर निविदेच्या दराची चालू दरसुची (सा.बां.विद्युत ०८-०९) नुसार तुलना केली असता हे दर चालू दरसुची प्रमाणे १५.५९% कमी येतात.

करीता मे. आकाश इलेक्ट्रीकल, औरंगाबाद यांची २३.७% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-ब** मधील वॉर्ड क्र.२, ३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २४, २५, २६, ४७, ४८, ४९ (एकुण १७ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक **मे. आकाश इलेक्ट्रीकल, औरंगाबाद** यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८६ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे, वि इ व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-क** मधील वॉर्ड क्र.२७, २८, २९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७ (एकुण १७ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२१,८६,२५०/- चे सन २००६-०७ आणि २००७-०८ च्या मूळ अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराने तयार करण्यात आले असुन त्यास दिनांक २०-११-२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.३५७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना (दुसरी वेळ) जा.क्र.मनपा/ई/निविदा/१३८/०९ दिनांक ३-१-२००९ प्रसिध्द करण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकुण पाच निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांक पर्यंत चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.१४-१-२००९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती | अं.प.दरापेक्षा २३% जास्त दराने |
| २. | मे.आकाश इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा २३.३% जास्त दराने |
| ३. | मे.असन्सो लाईटस, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा ३०.५१% जास्त दराने |
| ४. | मे.ईगल इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | Technically Rejected |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% जास्त दराने मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स,अमरावती यांची निविदा आहे. सदर निविदेच्या दराची चालू दरसुची (सा.बां.विद्युत ०८-०९) नुसार तुलना केली असता हे दर चालू दरसुची प्रमाणे १६.०७% कमी येतात.

करीता मे. ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती यांची २३% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-क** मधील वॉर्ड क्र.२७, २८, २९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७ (एकुण १७ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक **मे. ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती** यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८७ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे, वि इ व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-ड** मधील वॉर्ड क्र.३३, ३६, ३७, ३८, ३९, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ९१, ९४, ९५ (एकुण १६ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२४,९०,५५०/- चे सन २००६-०७ आणि २००७-०८ च्या मूळ अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराने तयार करण्यात आले असुन त्यास दिनांक २०-११-२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.३५७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना (दुसरी वेळ) जा.क्र.मनपा/ई/निविदा/१३८/०९ दिनांक ३-१-२००९ प्रसिध्द करण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकुण सहा निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांक पर्यंत चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.१४-१-२००९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती | अं.प.दरापेक्षा २३.२% जास्त दराने |
| २. | मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनीक्स औद्योगीक सह. संस्था लि.औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा २७.७३% जास्त दराने |
| ३. | मे. आकाश इलेक्ट्रीकल, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा ३०.५% जास्त दराने |
| ४. | मे. असन्सो लाईटस, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा ३१.५१% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२% जास्त दराने मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती यांची निविदा आहे. सदर निविदेच्या दराची चालू दरसुची (सा.बां.विद्युत ०८-०९) नुसार तुलना केली असता हे दर चालू दरसुची प्रमाणे १५.९३% कमी येतात.

करीता मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती यांची २३.२% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-ड** मधील वॉर्ड क्र.३३, ३६, ३७, ३८, ३९, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ९१, ९४, ९५ (एकुण १६ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक **मे. ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती** यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे, वि इ व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-ई** मधील वॉर्ड क्र.२३, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८४ (एकुण १६ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२०,४०,४००/- चे सन २००६-०७ आणि २००७-०८ च्या मूळ अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराने तयार करण्यात आले असुन त्यास दिनांक २०-११-२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र. ३५७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना (दुसरी वेळ) जा.क्र.मनपा/ई/निविदा/१३८/०९ दिनांक ३-१-२००९ प्रसिध्द करण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकुण चार निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांक पर्यंत चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.१४-१-२००९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनीक्स औद्योगीक सह. संस्था लि.औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा २३.४१% जास्त दराने |
| २. | मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती | अं.प.दरापेक्षा २६% जास्त दराने |
| ३. | मे. असन्सो लाईटस, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा २९.५१% जास्त दराने |
| ४. | मे. आकाश इलेक्ट्रीकल, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा ३१.१% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.४१% जास्त दराने मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनीक्स औद्योगीक सहकारी संस्था लि. औरंगाबाद यांची निविदा आहे. सदर निविदेच्या दराची चालू दरसुची (सा.बां.विद्युत ०८-०९) नुसार तुलना केली असता हे दर चालू दरसुची प्रमाणे १५.७८% कमी येतात.

करीता मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनीक्स औद्योगीक सहकारी संस्था लि. औरंगाबाद यांची २३.४१% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-ई** मधील वॉर्ड क्र.२३, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८४ (एकुण १६ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक **मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनीक्स औद्योगीक सहकारी संस्था लि. औरंगाबाद** यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.४१% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८९ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे, वि इ व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **प्रभाग-फ** मधील वॉर्ड क्र.५०, ६६, ६७, ६८, ६९, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९२, ९३, ९६, ९७, ९८, ९९ (एकुण १७ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.१६,३०,४००/- चे सन २००६-०७ आणि २००७-०८ च्या मूळ अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% कमी दराने तयार करण्यात आले असुन त्यास दिनांक २०-११-२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.३५७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना (दुसरी वेळ) जा.क्र.मनपा/ई/निविदा/१३८/०९ दिनांक ३-१-२००९ प्रसिध्द करण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकुण तीन निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांक पर्यंत तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.१४-१-२००९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.असन्सो लाईटस, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा २२.५१% जास्त दराने |
| २. | मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती | अं.प.दरापेक्षा २५% जास्त दराने |
| ३. | मे.आकाश इलेक्ट्रीकल, औरंगाबाद. | अं.प.दरापेक्षा २९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५१% जास्त दराने मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची निविदा आहे. सदर निविदेच्या दराची चालू दरसुची (सा.बां.विद्युत ०८-०९) नुसार तुलना केली असता हे दर चालू दरसुची प्रमाणे १६.४१% कमी येतात.

करीता मे. असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची २२.५१% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-फ** मधील वॉर्ड क्र.५०, ६६, ६७, ६८, ६९, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९२, ९३, ९६, ९७, ९८, ९९ (एकुण १७ वॉर्ड) मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने त्रैवार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक **मे. असन्सो लाईटस्, औरंगाबाद** यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५१% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.५२, एम.जी.एम. ते गंजेशहीदा चौक उर्वरीत रस्त्याचे कॉंक्रीट पेवमेंट बांधणी करणेच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार रक्कम रू.३०,००,०००/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च स्लम भागात नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षामधून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आर. के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ११.९९% कमी दराने |
| २. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ३.४५९% कमी दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९९% कमी दराची मे. आर. के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे. तरी सदरील कामासाठी मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९९% कमी दराचे निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.५२, एम.जी.एम. ते गंजेशहीदा चौक उर्वरीत रस्त्याचे कॉंक्रीट पेवमेंट बांधणी करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९९% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रसताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र. ५०, एलोरा डायग्नोस्टीक ते मोतीवालानगर रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे सा.बां. खात्याच्या सन २००७-०८ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१२,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००८-०९ या आर्थिक वर्षात शहरी भागात पुनःडांबरीकरण करणे या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत आदेशीत केलेले आहे.

तरी रक्कम रू.१२,००,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ५०, एलोरा डायग्नोस्टीक ते मोतीवालानगर रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ जलतरण तलाव येथे गॅलरी शेड बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.९,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिल्यानुसार उपरोक्त कामास्तव ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७८% कमी दराची निविदा श्री.एस.एम.इब्राहीम यांची प्राप्त झाली आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. तथापि स.नगरसेवक यांनी सदरील गॅलरी शेडचे एकुण क्षेत्रफळ पुर्णपणे Cover करणे बाबत व या ठिकाणी प्रस्तावित १.०० mm जाडीचे शिट ऐवजी २.०० mm जाडीचे शिट वापरणे बाबत सुचित केले आहे. उपरोक्त वाढीव क्षेत्र व शिट मधील जाडीच्या बदलामुळे साधारणपणे रक्कम रू.५.०० लक्ष इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१४.०० लक्ष चे तयार करण्यात आले असुन त्यास मा.स्थायी समितीकडे मान्यतेस्तव शिफारस करण्यात येत आहे.

त्यानुसार उपरोक्त कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१४.०० लक्ष चा प्रस्ताव व वाढीव रक्कम रू.५.०० लक्ष चे वाढीव काम मुळ गुत्तेदार श्री.एस.एम.इब्राहीम यांचेकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७८% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलाव येथे गॅलरी शेड बांधणे या कामांतर्गत सदरील गॅलरी शेडचे एकुण क्षेत्रफळ पुर्णपणे Cover करणे बाबत व या ठिकाणी प्रस्तावित १.०० mm जाडीचे शिट ऐवजी २.०० mm जाडीचे शिट वापरणेच्या सुचनेनुसार वाढीव क्षेत्र व शिट मधील बदलामुळे या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१४.०० लक्ष व वाढीव रक्कम रू.५.०० लक्ष चे वाढीव काम मुळ गुत्तेदार श्री.एस.एम.इब्राहीम यांचेकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.२ मधील स.नं.१५६ सिध्देश्वर कॉलनी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे सा.बां.विभागाच्या सन २००८-०९ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.१९,७२,०००/- चे अंदाजपत्रक तयार केले असून त्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झालेली आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २००८-२००९ मध्ये नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुद ठेवण्यात आलेली आहे. करीता सदर कामाचे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मधील स.नं.१५६ सिध्देश्वर कॉलनी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,७२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.२ मधील मयुरपार्क भागातील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे सा.बां.विभागाच्या सन २००८-०९ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.१३,९२,०००/- चे अंदाजपत्रक तयार केले असून त्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झालेली आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २००८-२००९ मध्ये नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुद ठेवण्यात आलेली आहे. करीता सदर कामाचे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मधील मयुरपार्क भागातील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१३,९२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१ हर्सुल प्रभागात नवीन दवाखाना बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१३.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००८-०९ या आर्थिक वर्षा अंतर्गत विकास इमारती शाळा व दवाखाने पान क्र.डब्ल्यु-५० अ.क्र.१४ या लेखा शिर्षका अन्वये उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१३.०० लक्ष चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१ हर्सुल प्रभागात नवीन दवाखाना बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१३.०० लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७२ एन-३, एन-४, सिडको येथील किलबील शाळेसमोर माजी आ.श्री.श्रीकांतजी जोशी यांच्या विकास निधीतून औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत सांस्कृतिक सभागृह बांधण्यात आलेले आहे.

हे सभागृह एन-४ येथील स्थानिक सेवाभावी संस्था 'परमार्थ महिला विश्वस्त मंडळ' ह्या संस्थेस नाममात्र शुल्क आकारून देण्यात यावे. सदरील सभागृहाची देखभालीची जबाबदारी संस्थेची राहील या अटीवर सदरील सभागृह वरील संस्थेस देण्यात यावे. करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक** : श्रीमती जयश्री किवळेकर **अनुमोदक** : दत्ताभाऊ पाथ्रीकर, सतीश कटकटे, सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.७२ एन-३, एन-४, सिडको येथील किलबील शाळेसमोर महानगरपालिकेमार्फत बाधण्यात आलेले सांस्कृतिक सभागृह, एन-४ येथील स्थानिक सेवाभावी संस्था 'परमार्थ महिला विश्वस्त मंडळ' ह्या संस्थेस नाममात्र शुल्क आकारून देण्यात यावे. सदरील सभागृहाची देखभालीची जबाबदारी संस्थेची राहील या अटीवर सदरील सभागृह वरील संस्थेस देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालयामार्फत दि.११ जानेवारी २००८ रोजी केलेल्या अर्ज विनंती नुसार तत्कालीन मा.आयुक्त श्री.असिम गुप्ता यांनी दि.१८ मार्च २००८ रोजी एन-३ उद्यानाजवळील जागा भाड्याने देण्यास मंजुरी दिली आहे. या उद्यानास लागुन ही जागा बंदीस्त स्वरूपात असल्याने या जागेचा महानगरपालिकेस कोणताच उपयोग होत नाही. या जागेचे एकुण क्षेत्रफळ

२३१८.९४ चौ.मी. एवढे आहे. या मंजुर जागेपैकी केवळ ६०० चौ.मी. एवढीच जागा वाचनालयास देण्यात यावी अशी मागणी कै. कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालयामार्फत करण्यात आलेली आहे. हे वाचनालय अत्यंत उत्कृष्ट आहे. या वाचनालयाची इमारत राजा राममोहन रॉय लायब्ररी प्रतिष्ठान, कोलकत्ता यांच्या इमारत अनुदान निधीतून बांधणार आहेत व त्यांचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे करण्यात येणार आहे. या इमारतीवर ताबा महानगरपालिकेचा असणार आहे.

करीता कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालयास वरील जागा नाममात्र दरात भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात यावी. करीता प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक** : श्रीमती जयश्री किवळेकर **अनुमोदक** : सतीश कटकटे, सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालयास एन-३ उद्यानाजवळील जागेचे एकुण क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. एवढे जागेपैकी केवळ ६०० चौ.मी. एवढी जागा वाचनालयास वाचनालयास वरील जागा नाममात्र दरात भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग कार्यालय (फ) अंतर्गत दर्गा हजरत शाहनुर महंमद हमवी परिसरात पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन नसल्यामुळे येणाऱ्या भाविकांना मोठा त्रास होत आहे. परिसरात शाहनुरमियाँ दर्गा रोडवर कमानी पासुन ते दर्गा शाहनुर मियाँ पर्यंत ४" व्यासाची जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव व यावर तयार करण्यात येणाऱ्या संभावीत खर्चास मान्यता द्यावी. करीता मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक** : मोमीन सफिया फिरदौस अय्युबखान **अनुमोदक** : सीताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग कार्यालय (फ) अंतर्गत दर्गा हजरत शाहनुर महंमद हमवी परिसरात येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी शाहनुरमियाँ दर्गा रोडवर कमानी पासुन ते दर्गा शाहनुर मियाँ पर्यंत ४" व्यासाची जलवाहिनी टाकण्यास त्यासाठी येणाऱ्या संभावीत खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद